**प्रेसनोट** **दि.२६/०७/२०१९**

## मुंढवा पोलीस ठाणे, पुणे शहर.

## कम्युनिटी पोलीसिंग अंतर्गत पोलीसांतर्फे व्यावसायीक व पुणे जिल्हा रिटेल व्यापारी असोशिएशन यांचा मेळावा आयोजीत करुन केले मार्गदर्शन

दि.२५/०७/२०१९ रोजी मुंढवा पोलीस ठाणे हद्दीतील व्यावसायीक व पुणे जिल्हा रिटेल व्यापारी असोशिएशन यांचा मेळावा लोणकर हॉल, मुंढवा, पुणे येथे आयोजीत करण्यात आला होता. सदर मेळाव्यामध्ये व्यावसायीक, व्यापारी संघटनेचे अध्यक्ष, पदाधिकारी, सदस्य व प्रतिष्ठीत नागरीक असे एकुण ३०० ते ३५० नागरीक उपस्थित होते.

सदर मेळाव्यामध्ये व्यावसायीकांच्या अडीअडचणी समाजवून घेवून त्या सोडविणेकामी पोलीसांतर्फे संपुर्ण सहाकार्य करण्यात येईल याबाबत वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. संपतराव भोसले, मुंढवा पोलीस ठाणे यांनी आश्वासन दिले.

तसेच व्यापारी/व्यावसायीक यांचे सुरक्षेच्या दृष्टीकोनातून आस्थापनांचे दर्शनी भागावर व मुख्य रोडचे दिशेन अशा प्रकारे सी.सी.टी.व्ही. बसविणे, आगामी दहिहंडी, गणेश उत्सव व विधानसभा निवडणुकीचे पार्श्वभुमीवर योग्य ती दक्षता घेणे कोणत्याही प्रकारचा अनुचीत प्रकर होवू न देणे याकरीता एक सतर्क नागरीक म्हणून पोलीस ठाणे तसेच नियंत्रण कक्षास त्याबाबतची माहिती देणे याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. त्याचप्रमाणे मा. पोलीस आयुक्त, पुणे शहर यांनी सुरू केलेल्या भरोसा सेल, पोलीस काका, बडीकॉप, जेष्ठ नागरीक व महिला, बालक यांची सुरक्षा अशा व इतर विविध उपक्रमाबद्दल माहिती दिली.

तरी नमूद पोलीस अधिकारी यांच्या चांगल्या कामगिरीबद्दल दैनिक वर्तमानत्रामध्ये प्रसिध्दी देण्यास विनंती आहे.